


# जानेवारी २०२५ चे राशी भविष्य- पौष महिना- शुक्ल व कृष्ण पक्ष
## लेखक - अजय तनखीवाले



**पार्श्वभूमी :**
नोव्हेंबर पासून वक्री झालेला गुरु बऱ्याच राशींना त्रासदायक ठरला आहे. शनिच्या सोबत त्याने नोव्हेंबर महिन्यात धुमाकूळ घातला. या महिन्यात गुरु वक्री आहे आणि त्याचा बऱ्याच राशींवर परिणाम दिसेल.


**उत्सव**: १४ जानेवारीला मकर संक्रांतिचा उत्सव आहे. पतंग उडवणे, हळदीकुंकू या प्रकारे हा सण सर्व भारतीय लोक साजरा करतात. पौर्णिमा १३ जानेवारीला आणि अमावस्या २९ जानेवारीला आहे. २६ जानेवारीला भारतात गणतंत्र दिन साजरा करतात.


महिन्यातील गोचर ग्रह: १. मेष राशीत वक्री हर्षल, २. गुरु (वक्री) वृषभेत, ३. मिथुन आणि कर्केत वक्री मंगळ, ४. केतु कन्या राशीत, ५. मकरेत रवि, बुध, आणि प्लूटो, ६. कुंभेत शनि, ७. शुक्र धनु आणि मकर राशीत, ८. राहु, नेपच्यून  मिनेत आहेत.

| १ जानेवारीची कुंडली | १५ जानेवारीची कुंडली |
|---|---|
|  |  |


**२.०: भविष्य-चंद्र राशी प्रमाणे वाचावे**: (भारतीय पध्दती प्रमाणे वाचावे).

काही लोकांना नक्षत्र माहित असते. दक्षिण भारतात त्यास स्टार म्हणतात. चंद्र राशीबरोबर नक्षत्र आणि चरण दिले आहे. तर राशी आणि नक्षत्र यापैकी जे माहिती असेल तो भाग वाचावा.

| राशी | भविष्य |
|---|---|
| २. १ मेष राशी (Mesh):<br><br><br>अश्विनी, भरणी, कृत्तिका(१) | • *शनि-११वा, गुरु-२रा,राहू-१२वा(अनिष्ट)*<br>• *अ. स्वास्थ्य:* अनपेक्षित आलेल्या संकटांना तुम्ही सामोरे जाल. राहूचा जाच मात्र चालू असेल.<br>• *ब. नोकरी/धंदा:* नवे व्यावसायिक प्रस्ताव येतील. भागीदारी यशस्वी होईल. पौर्णिमेजवळ मोठे उत्सव प्रदर्शने होतील.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* पती-पत्नीचा भाग्योदय होईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* राजकीय शत्रुत्वातून त्रास होईल. पण या वर्षाच्या गुंतवणुकीत भरभराट होईल. वक्री गुरु धनाबद्दल मात्र लाभदायक ठरेल. प्रोफेशनल सल्लागार मार्गदर्शन करतील.<br>• *इ. कौटुंबिक:* उत्तरार्धात भावंडांची तब्येत चिंतेची होईल, उत्तरार्धात आईची काळजी घ्या.<br>• *फ. परदेश गमन:* परदेशात तुमचे नाव मोठे होईल.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा: **ॐ ह्रीं श्रीं लक्ष्मी नारायणाय नमः ।।** |
| २.२ वृषभराशी (Vrishabha):<br><br><br>कृत्तिका(२,३,४), रोहिणी, मृग (१,२) | • *शनि-१०वा,गुरु-१ला,राहू-११वा*<br>• *अ. स्वास्थ्य:* स्वास्थ्य उत्तम असेल. अपघात मात्र टाळा. वक्री गुरु स्वास्थात चांगलीच सुधारणा दर्शवेल.<br>• *ब. नोकरी/धंदा:* रवी गुरुच्या योगातून तरुणांना मार्गदर्शन मिळेल. नाव खराब होइल असे काही करू नका. आपल्या हिशोबीपणा आणि लोकांना जवळ ठेवण्याच्या स्वभावामुळे व्यवसायात प्रगती कराल. शनि ग्रह व्यवसायात प्रगती घडवून देईल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* गुरु ग्रहाच्या साथीने हा काळ उत्तम जाईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* व्यावसायिक भांडवल मिळेल. पौर्णिमेजवळ मोठे करार सही कराल. मात्र या काळात वक्री राहू नुकसान घडवेल.<br>• *इ. कौटुंबिक:* घरातील कार्यांवर खर्च होईल.<br>• *फ. परदेश गमन:* परदेशी भाग्योदय होईल.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा: **ॐ गोपालाय उत्तर ध्वजाय नमः ।।** |

| | | |
|---|---|---|
| २.3 मिथुन राशी (Mithun):<br><br><br>मृग(३,४), आर्द्रा, पुनर्वसु(१,२,३) | | • *शनि-९वा,गुरु-१२वा(अनिष्ट),राहू–१०वा*<br>• *अ. स्वास्थ्य:* पूर्वार्धात वक्री मंगळाचा विचित्र प्रभाव राहील. अमावस्या वेदनायुक्त असेल. वक्री गुरु मुळे तब्येत नाजूक असेल.<br>• *ब. नोकरी/धंदा:* फसवणूक होण्याची शक्यता आहे. मात्र उत्तरार्धात सर्व सुरळीत चालेल. नोकरीत लाभ होईल. अनपेक्षित संकटातून मार्ग काढाल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* तरुणांना स्थैर्य येईल, शैक्षणिक चिंता जाईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* वक्री मंगळ मुळे खर्च वाढतील. पुंजीत घट होईल.<br>• *इ. कौटुंबिक:* जोडीदाराची साथ मिळेल आणि संसार सुख लाभेल.<br>• *फ. परदेश गमन:* परदेशी कंत्राट सह्या करून वारंवार प्रवास होईल.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा: **क्लीं कृष्णाय नमः ।।** |
| २.४ कर्क राशी (Karka):<br><br><br>पुनर्वसु(१), पुष्य, आश्लेषा | | • *शनि–८वा(अनिष्ट), गुरु-११वा,राहू-९वा*<br>• *अ. स्वास्थ्य:* वक्री मंगळाचा त्रास असेल. वक्री शनिमुळे इस्पितळात वारंवार जावे लागेल. दीर्घकालीन व्याधी त्रासदायक ठरतील.<br>• *ब. नोकरी/धंदा:* नोकरीत जास्तच ताण भासेल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* पौर्णिमेजवळ वादाचा काळ असेल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* परदेशाच्या गुंतवणुका घसरतील.<br>• *इ. कौटुंबिक:* घरात स्त्रीचिंता असेल. अमावस्या विचित्र जागरणाची असेल. थोरा मोठ्यांच्या सहकार्याने संकटावर तुम्ही मात कराल. भावंडात मात्र तणावाचे वातावरण असेल.<br>• *फ. परदेश गमन:* होईल पण थोडे गौड बंगाल वाटेल.<br>•<br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा: **हिरण्य गर्भाय अव्यक्त रूपिणे नमः ।।** |
| २. ५ सिंहराशी (Simha):<br><br><br>मघा, पूर्वा, उत्तरा(१) | | • *शनि–७वा,गुरु-१०वा,राहू– ८वा(अनिष्ट)*<br>• *अ. स्वास्थ्य:* अमावस्येजवळ संसर्गजन्य रोगांची बाधा होऊ शकते आणि विचित्र खर्च निर्माण होतील. अनिष्ट राहू मुळे सारखे दवाखान्यात जावे लागेल. पण त्यावर तुम्ही उपाय काढाल.<br>• *ब. नोकरी/धंदा:* पौर्णिमेजवळ वरिष्ठांची मर्जी आणि कृपा संपादन कराल. वक्री गुरु, धंद्यासाठी व नोकरीत चांगलीच चालना देईल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* संसार उत्तम चालू असेल. एकमेकांना उत्तम साथ द्याल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* व्यावसायिक कोर्ट प्रकरण शमेल.<br>• *इ. कौटुंबिक:* मुलांना शाळेत भरपूर यश मिळेल. पारितोषिकेही मिळतील.<br>• *फ. परदेश गमन:* शक्यता आहे. |

| | |
|---|---|
| | *हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:* **क्लीं ब्रह्मणे जगदाधाराय नमः ।।** |
| २. ६ कन्या राशी (Kanya):<br><br>उत्तरा(२,३,४), हस्त, चित्रा (१,२) | • *शनि–६वा(अनिष्ट),गुरु-९वा,राहू-७वा*<br>• *अ. स्वास्थ्य:* मानसिक वातावरण बिघडण्याची शक्यता आहे. प्रारंभी सांभाळा. वाहने वा उपकरणे सांभाळून चालवा, जपून वापरा.<br>• *ब. नोकरी/धंदा :* पौर्णिमा नोकरी व्यवसायात शुभ शकुनी असेल आणि भरतीची चाहूल लागेल. तरुणांचे भाग्योदय होतील.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* जोडीदारासोबत थोडा गैरसमज होण्याची शक्यता आहे.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* मंगळ पुंजीची नासधूस करेल.<br>• *इ. कौटुंबिक:* आईची तब्येत उत्तम असेल. तिच्या मदतीने काही समस्या सुटतील.<br>• *फ. परदेश गमन:* वक्री गुरु परदेशातील गिऱ्हाईक आणेल.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा : **ॐ नमो प्रीं पीताम्बराय नमः ।।** |
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br>चित्रा(३,४), स्वाती, विशाखा (१,२,३) | • *शनि ५, वा, गुरु ८ वा(अनिष्ट) , राहू-६ वा (अनिष्ट)*<br>• *अ. स्वास्थ्य* : उत्तम असेल.<br>• *ब. नोकरी/धंदा:* नोकरीत प्रतिक्रिया सांभाळा. उत्तरार्धात मात्र वैयक्तिक कामातुन यश देणारा असेल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* सर्व उत्तम चालेल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* अमावस्येजवळ विशिष्ट शत्रुत्वाच्या झळा बसतील.<br>• *इ. कौटुंबिक:* भावंडात एकी आढळेल. मुलांच्या अंगच्या कलांचा विकास होईल आणि उत्तम पाया तयार होईल.<br>• *फ. परदेश गमन:* दाट शक्यता आहे. प्रयत्न चालू ठेवा.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा **: तत्त्व निरंजनाय तारकरामाय नमः ।।** |
| २. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):<br><br>विशाखा(४), अनुराधा, ज्येष्ठा | • *शनि–४था, गुरु-७वा,राहू-५वा*<br>• *अ. स्वास्थ्य:* दुखापतीपासून सावध रहा.<br>• *ब. नोकरी/धंदा:* गुरु भ्रमणाचा लाभ मिळेल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:* पौर्णिमेनंतर पती व पत्नीची चिंता जाईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:* विशिष्ट वसुली होईल आणि वास्तुविषयक व्यवहार पूर्ण होतील.<br>• *इ. कौटुंबिक:* मुलांना बरेच वेळा तुमच्या मार्गदर्शनाची गरज असते, नाहीतर ती भरकटू शकतात.<br>• *फ. परदेश गमन:* तुम्ही पुढाकार घेऊन प्रयत्न कराल पण अडचणी तितक्याच येतील. |

| | | |
|---|---|---|
| | | हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा: **नारायणाय सुरसिंहाय नमः ।।** |
| २. ९ धनू राशी(Dhanu):<br><br><br>मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा(१) | | • <u>*शनि–३रा, गुरु-६वा(अनिष्ठ),राहू-४था*</u><br>• <u>*अ. स्वास्थ्य:*</u> या मासात स्वास्थ्य उत्तम असेल. पूर्वार्ध मात्र खडतर जाईल.<br>• <u>*ब. नोकरी/धंदा:*</u> व्यावसायिक प्राप्ती छान असेल. तुम्हालाही प्रसिध्दी मिळेल.<br>• <u>*क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:*</u> वैवाहिक जीवनात वाद टाळा. भांडणे होण्याची शक्यता आहे.<br>• <u>*ड. वित्त/ गुंतवणुकी:*</u> या महिन्यात कोणताही जुगार नको. शत्रू पक्ष कोर्टकचेऱ्या करून त्रास देइल.<br>• <u>*इ. कौटुंबिक:*</u> अमावस्या अशांततेची असेल.<br>• <u>*फ. परदेश गमन:*</u> धंद्यात कामे वाढविण्यासाठी तुम्ही परदेशी जाल.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा: **ॐ श्रीं देवकृष्णाय रूज़ख़्ताय नमः ।।** |
| २. १० मकर राशी (Makar):<br><br><br>उत्तराषाढा(२,३,४), श्रवण, धनिष्ठा(१,२) | | • <u>*शनि-२रा, गुरु–५वा,राहु-३रा*</u><br>• <u>*अ. स्वास्थ्य:*</u> उत्तरार्धात जुनाट व्याधींचा त्रास होऊ शकतो.<br>• <u>*ब. नोकरी/धंदा:*</u> *सरकारी माध्यमातून लाभ होईल.*<br>• <u>*क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:*</u> जोडीदार साथ देईल.<br>• <u>*ड. वित्त/ गुंतवणुकी:*</u> व्यवहारात कायदेशीर बाबी जपा, अमावस्या विचित्र गुप्त चिंतेची असेल.<br>• <u>*इ. कौटुंबिक:*</u> भावंडात गैरसमज होतील. मुलं मात्र परीक्षेत उत्तम कामगिरी बजावतील.<br>• <u>*फ. परदेश गमन:*</u> या महिन्यात शक्यता कमी आहे.<br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा: **ॐ श्रीं वत्सलाय नमः ।।** |
| २. ११ कुंभ राशी (Kumbha):<br><br><br>धनिष्ठा(३,४), शततारका, पूर्वाभाद्रपदा (१,२,३) | | • <u>*शनि–१ला, गुरु– ४था, राहू– २रा*</u><br>• <u>*अ. स्वास्थ्य:*</u> उत्तरार्धात नाजुक असेल. काळजी घ्या.<br>• <u>*ब. नोकरी/धंदा:*</u> उत्तरार्धात व्यवसायिक कामगार पिढीचा त्रास असेल.<br>• <u>*क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:*</u> घरगुती वातावरण उत्तम राहील. पौर्णिमेपर्यंत घरात सुवार्ता येईल. तरुणांना प्रेमप्रकरणातून त्रास होईल, अमावस्या स्त्री चिंतेची असेल.<br>• <u>*ड. वित्त/ गुंतवणुकी:*</u> चांगले सल्लागार मार्गदर्शन करतील आणि पैशाची नासधूस कमी होईल. पूर्वार्धात मात्र कामगार दंडुकेबाजी करतील.<br>• <u>*इ. कौटुंबिक:*</u> आधुनिक तंत्रज्ञान वापरून कुटुंबाला बांधून ठेवाल.<br>• <u>*फ. परदेशगमन:*</u> शक्यता कमी आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:**ॐ श्रीं उपेन्द्राय अच्युताय नमः ।।** |
| २.१२ मीन राशी (Meena):<br>पूर्वाभाद्रपदा (४), उत्तराभाद्रपदा, रेवती<br><br>Pisces | | • <u>*शनि–१२वा, (अनिष्ट),गुरु-३रा,राहू-१ला*</u><br>• <u>*अ. स्वास्थ्य:*</u> अनपेक्षित व्याधींचा त्रास होईल.<br>• <u>*ब. नोकरी/धंदा:*</u> पूर्वार्धात वैयक्तिक उपक्रमातून यश मिळेल पौर्णिमेजवळ तरुणांना विशिष्ट स्पर्धात्मक यश मिळेल. व्यावसायिक सरकारी कामे होतील, नोकरीत प्रशंसा मिळेल.<br>• <u>*क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:*</u> उत्तरार्धात जोडीदार रोमँटिक होईल.<br>• <u>*ड. वित्त/ गुंतवणुकी:*</u> आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून फायदा कराल.<br>• <u>*इ. कौटुंबिक:*</u> उत्तरार्धात नातेवाईकांशी वाद होण्याची शक्यता आहे.<br>• <u>*फ. परदेश गमन*</u> : सल्लागार म्हणून परदेशी जाल.<br>•<br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:**ॐ क्लीं उद्धृताय उद्धारिणे नमः ।।** |